# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.06.2025** **वारःगुरुवार**

---

1. क्रोएशियाचा पहिला आणि ऐतिहासिक दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी भारताकडे रवाना. भारत-क्रोएशियादरम्यान चार संयुक्त सहकार्य करार.
2. ऑपरेशन सिंधू मोहिमेअंतर्गत उत्तर इराणमधून 110 विद्यार्थ्यांना घेऊन आलेलं विमान आज पहाटे नवी दिल्लीत दाखल.
3. इराण आणि इस्राईल यांच्यातला संघर्ष आणखी तीव्र. इस्राईलकडून हल्ल्यांचं सत्र सुरूच. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेची उद्या न्यूयॉर्कमध्ये तातडीची बैठक
4. मलेशियात सुरू असलेल्या आशियाई स्क्वाश अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा वेलावन सेंथिलकुमारकडून जपानचा टोमोटाका एंडोचा तीन-शून्य असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश आणि
5. अरण्यऋषि मारुति चितमपल्ली यांचं देहावसान

**<u>क्रोएशिया दौरा</u>**

आपला क्रोएशियाचा पहिला आणि ऐतिहासिक दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी भारतात रवाना झाले आहेत. अनेक उच्चस्तरीय बैठका झालेल्या या दौऱ्यामुळे भारत-क्रोएशियाच्या संबंधांमध्ये उल्लेखनीय सुधारणा झाली आहे. हा दौरा ऐतिहासिक झाल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. मैत्री आणि व्यापक सहयोगाचा नवा अध्याय सुरू झाल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

पंतप्रधान मोदी यांनी बान्स्की ड्वोरी इथं क्रोएशियाचे पंतप्रधान अँद्रेज प्लेकोविक यांच्याशी शिष्टमंडळस्तरीय चर्चा केली. त्यानंतर उभय देशांनी संयुक्त निवेदन जारी केलं. त्यात जागतिक शांतता, लोकशाही मूल्यं आणि व्यापार, तंत्रज्ञान आणि संस्कृती या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्याबाबत कटिबद्धता व्यक्त करण्यात आली. युरोप किंवा आशिया अशा कोणत्याही ठिकाणच्या संघर्षात शांततापूर्ण तोडगा निघाला पाहिजे असं मत पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केलं. युद्धभूमीवर तोडगे निघू शकत नाहीत असं ते म्हणाले. सर्व देशांची एकात्मिकता आणि भौगोलिक एकात्मता यांच्याबाबतची भारताची कटिबद्धताही त्यांनी स्पष्ट केली. सर्व प्रकारच्या दहशतवादाचा त्यांनी निषेध केला.

द्विपक्षीय व्यापार वाढवणं आणि लवचिक आणि विश्वासार्ह पुरवठा साखली तयार करण्याबाबत दोन्ही नेत्यांनी सहमती व्यक्त केली. दोन्ही देशांनी चार संयुक्त सहकार्य करारही केले आहेत. पंतप्रधानांनी क्रोएशियाचे अध्यक्ष झोरान मिलानोविक यांच्याबरोबरही स्वतंत्र चर्चा केली. द्विपक्षीय संबंध वाढवण्याबाबत त्यांच्यात चर्चा झाली. प्लेंकोविक यांनी मोदी यांच्यासाठी झाग्रेब इथं भोजनसमारंभाचंही आयोजन केलं होतं.

**<u>ऑपरेशन सिंधू</u>**

ऑपरेशन सिंधू मोहिमेअंतर्गत उत्तर इराणमधून 110 विद्यार्थ्यांना घेऊन आलेलं विमान आज पहाटे नवी दिल्लीत दाखल झालं. इस्राईल आणि इराणमध्ये वाढत असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतानं आपल्या नागरिकांना इराणमधून परत आणण्यासाठी ऑपरेशन सिंधू ही मोहीम आखली आहे. पहिल्या टप्प्यात 110 विद्यार्थ्यांना इराणमधून येरेवान या अर्मेनियाच्या राजधानीत आणण्यात आलं आणि तिथून काल दुपारी विमानानं विद्यार्थी भारताकडे परत आले. भारत इराण आणि अर्मेनिया

सरकारचा ऋणी असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. दरम्यान, इराणमधील भारतीय नागरिकांनी तेहरानमधील दूतावासाच्या संपर्कात राहावं असं आवाहन करण्यात आलं आहे.

**इराण-इस्राईल संघर्ष**

इराण आणि इस्राईल यांच्यातला संघर्ष आणखी तीव्र झाला आहे. इस्राईलनं इराणवर काल आणखी तीन टप्प्यांमध्ये हल्ले केले. त्यामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या वाढल्याचं इराणनं म्हटलं आहे. इस्राईलनं इराणच्या राष्ट्रीय पोलिसांचं मुख्यालयावर हल्ला केल्यानं अनेक जण जखमी झाले आहेत. तेहरानमधल्या रणगाडाविरोधी क्षेपणास्त्र प्रकल्पासह चाळीस ठिकाणीही हल्ले करण्यात आले. सततच्या बॉंबहल्ल्यांमुळं तेहरान आणि इतर शहरांमध्ये घबराट पसरली आहे. आत्तापर्यंत सुमारे 585 जणांचा मृत्यू झाला, तर तेराशे जण जखमी झाल्याचं इराणचे अधिकारी आणि मानवी हक्क संघटनांचं म्हणणं आहे. दरम्यान इराणच्या रिव्होल्युशनरी गार्डनं बदला घेऊ असं म्हटलं आहे, तर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांनी आंतरराष्ट्रीय दबावाला बळी पडणार नसल्याचं म्हटलं आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी या भागात लष्करी तैनातीत वाढ केली आहे आणि इराणनं विनाअट शरण यावं अशी मागणी केली आहे.

**संयुक्त राष्ट्र बैठक**

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेची उद्या न्यूयॉर्कमध्ये तातडीची बैठक होणार आहे. इराणमधल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराण, चीन, पाकिस्तान आणि रशियाच्या मागणीवरून ही बैठक होत आहे.

**रशिया-मध्यस्थी**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी इस्राईल आणि इराण संघर्षात मध्यस्थीची तयारी दाखवली आहे. सेंट पीट्सबर्ग आर्थिक मंच परिषदेगरम्यान पुतिन यांनी हा प्रस्ताव मांडला. मॉस्कोच्या मध्यस्थीमुळे इराणला शांततापूर्ण आण्विक कार्यक्रम सुरू ठेवता येईल आणि इस्राईलच्या सुरक्षाविषयक चिंतांचं समाधान होईल असा दावा त्यांनी केला आहे

**विधानसभा पोटनिवडणूक**

चार राज्यांमधल्या विधानसभेच्या पाच जागांसाठी आज पोटनिवडणूक होत आहे. गुजरातमधल्या दोन जागांसाठी, तर केरळ, पश्चिम बंगाल आणि पंजाबमधल्या प्रत्येकी एका जागेसाठी आज पोटनिवडणूक होत आहे. गुजरातमधील आमदार करसनभाई सोळंकी, पंजाबमधील आमदार गुरप्रीत बस्सी योगी आणि पश्चिम बंगालमधील आमदार नसिरुद्दिन अहमद यांचं निधन झाल्यामुळे तर गुजरातमधील आमदार भयानी  गांदुभाई आणि केरळमधील आमदार पी. व्ही. अन्वर यांनी राजीनामा दिल्यामुळे ही पोटनिवडणूक होत आहे. 23 तारखेला मतमोजणी होणार आहे. दरम्यान, राज्यसभेच्या आठ जागांसाठीही आज मतदान होणार आहे.

**गोदावरी प्रकल्प**

आंध्र प्रदेशकडून प्रस्तावित असलेल्या गोदावरी-बनकचारला लिंक प्रकल्पाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याची घोषणा तेलंगणचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्‌डी यांनी केली. काल झालेल्या सर्वपक्षीय बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना रेड्‌डी यांनी ही माहिती दिली. या प्रकल्पात गोदावरी नदीतून पोलावरम इथं कृष्णा खोऱ्यात पाणी वळवलं जाणार आहे. त्याचा तेलंगणच्या शेतकऱ्यांना फटका बसणार असल्यानं कायदेशीर लढाईसाठी राज्य सरकार कायदा तज्ज्ञांची नेमणूक करेल, असं रेड्‌डी यांनी म्हटलं आहे

**पालखी प्रस्थान सोहळा**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा 340 वा पालखी प्रस्थान सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यात श्री क्षेत्र देहू इथं काल पार पडला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या सोहळ्यात सहभागी झाले. भागवत धर्म आणि वारकरी संप्रदाय यांनी शेकडो वर्ष आक्रमणातून आपल्या देवतेचं संस्कृतीतून रक्षण केल आहे. म्हणून वारकरी

संप्रदायाची जोड घेऊन आपली संस्कृती पुढं जात आहे. या प्रस्थान सोहळ्यात सहभागी होऊन आपल्याला अतिशय आनंद झाला अशी भावना फडणवीस यांनी व्यक्त केली. पंढरीच्या वारीसाठी मोठ्या संख्येनं वारकरी देहू नगरीत दाखल झाले होते. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते तुकाराम महाराजांच्या पादुकांचं पूजन, पालखीची विधिवत प्रस्थान पूजा आणि आरती करण्यात आली. महापुजेनंतर पालखीनं इनामदार वाड्यातील मुक्कामाकडं प्रस्थान केलं. या सोहळ्यात सुमारे 500 दिंड्या सहभागी झाल्या आहेत.

**साहित्य अकादमी पुरस्कार**

साहित्य अकादमीच्या 'युवा' आणि 'बाल' साहित्य पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. यामध्ये मराठी भाषेसाठी प्रदीप कोकरे यांची 'खोल खोल दुष्काळ डोळे' ही कादंबरी आणि सिंधी भाषेतील 'पांधीअड़ो' या कविता संग्रहासाठी मंथन बचाणी यांची 'युवा' साहित्य अकादमी पुरस्कारासाठी निवड झाली, तर 'बाल' साहित्य अकादमी पुरस्कारासाठी कवी डॉ. सुरेश सावंत यांच्या 'आभाळमाया' या कविता संग्रहाची निवड झाली आहे.

**हॉकी इंडिया मास्टर्स**

हॉकी इंडिया मास्टर्स स्पर्धा काल चेन्नईत सुरू झाली. महिलांच्या गटात कर्नाटक संघानं केरळचा, तर महाराष्ट्राच्या संघानं हिमाचल प्रदेश संघाचा पराभव केला. पुरुषांच्या गटात पंजाबच्या संघानं पुदुच्चेरी संघाचा तर तमिळनाडूनं केरळ संघाचा पराभव केला.

**आशियाई स्क्वाश**

मलेशियात सुरू असलेल्या आशियाई स्क्वाश अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा वेलावन सेंथिलकुमारनं जपानचा टोमोटाका एंडोचा तीन-शून्य असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. भारताचा हा एकमेव खेळाडू आहे. यापूर्वी सूरज चांद, आकांक्षा साळुंखे आणि शमीना रियाझ स्पर्धेतून बाहेर पडले आहेत.

**चितमपल्ली**

निसर्गवादी, वन्यजीव संरक्षक आणि प्रख्यात लेखक, पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित अरण्यऋषि मारुति चितमपल्ली यांचं काल सोलापुर इथं राहत्या घरी वृद्धापकाळानं निधन झालं. ते 94 वर्षांचे होते. आज दुपारी 1 वाजल्यानंतर त्यांची अंत्ययात्रा निघणार आहे. चितमपल्ली यांनी कर्नाळा पक्षी अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा वन्यजीव अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांसारख्या विविध जंगलं आणि राष्ट्रीय उद्यानांमध्ये वन विभागाच्या माध्यमातून 36 वर्ष सेवा करताना वन्यप्राण्यांचं वर्तन, वनस्पती, पक्षी यांचा अभ्यास केला आणि जंगलांशी संबंधित रहस्यांचा वेध घेतला, ते अनुभव आपल्या लेखणीतून वाचकांसमोर सजीव केले आणि मोठी ग्रंथसंपदा निर्माण केली. निलवंती, जंगलाचं देणं, घरट्या पलिकडे, रातवा, रानवाटा, प्राणीकोश, पक्षीकोश, अशा अनेक पुस्तकांमधून ते पुढील पिढ्यांना निसर्गाची शब्दसहल घडवत राहतील.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.